REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# तर्कशास्त्राचे आधुनिक काळातील उपयोजन

भोईटे सुनिल बबनराव
मानसशास्त्र व तर्कशास्त्र विभाग,
चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय,शिरूर.

## प्रस्तावना :


सर्व विषयांचे अथवा ज्ञानशाखांचे उगमस्थान म्हणून तत्त्वज्ञानाचा उल्लेख प्राचीन काळापासून होताना दिसतो. अंतिम सत्याचे ज्ञान प्राप्त करण्याचे साधन म्हणून तत्त्वज्ञानाकडे पाहिले जाते. तत्त्वज्ञान ही सर्व अभ्यासविषयांची जननी आहे असेही आपण म्हणतो. काळाच्या ओघात तत्त्वज्ञानातील वेगवेगळे विचारप्रवाह स्वतंत्र विषय म्हणून विकसित होउ लगले व त्यांचा स्वतंत्र असा विषय म्हणून गणना होउ लागली. असे असले तरी या सर्व विषयांचे अथवा शास्त्रांचे मूळ कायमच तत्त्वज्ञान असल्याचे नेहमी प्रात्ययास येते.

आज शाळा महाविद्यालयांमध्ये आवश्यकता असताना देखील तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व नीतिशास्त्रासारखे विषय शिकविले जात नाहीत ही खंत आहे. शाळा पातळीवर मूल्यशिक्षण हा विषय शिकविला जातो पण तो कितपत योग्य पद्धतीने शिकविला जातो याबाबत शंका आहे. शिकविणारा अध्यापक तत्त्वज्ञान विषय घेऊन बी.एड. झालेला शिक्षक आहे का हे देखील पाहिले जात नाही हे दुदैव आहे. ज्या वयात विद्यार्थ्यांच्या वैचारिक विकासाला सुरूवात होत असते अशा काळात शाळा पातळीवर लहान मुलांना मूल्यशिक्षणाबरोबरच तर्कशास्त्र हा विषय देखील आवश्यक विषय म्हणून शिकविला जाण्याची गरज आहे. योग हा विषय तत्त्वज्ञान विषयाचा एक घटक आहे जो लहान मुलांच्या शारीरिक व मानसिक सदृढतेसाठी अत्यावश्यक असा विषय आहे. त्याचाही समावेश शालेय शिक्षण पातळीवर होणे हितकारक ठरेल कारण लहान मुलांचे हे वय शारीरिक व मानसिक जडणघडणीचे असते. भूतकाळात काय झाले यापेक्षा आज वर्तमानात काय केले असता विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी मदत होईल याचा विचार करायला हवा.

आजही तत्त्वज्ञानातील काही विषय तत्त्वज्ञानापासून वेगळे झाले नाहीत. ते तत्त्वज्ञानाच्या पूरक शाखा म्हणून कार्यरत आहे. त्यामध्ये नीतिशास्त्र, सत्ताशास्त्र, सामाजिक तत्त्वज्ञान, धर्माचे तत्त्वज्ञान, ज्ञानशास्त्र, तर्कशास्त्र, इच्छा, परस्पर सहकार्याची भूमिका, समन्वयाची व विकसनाची भूमिका पार पाडली आहे. तर्कशास्त्र हा या सर्व तत्त्वज्ञानाच्या शाखांपैकी एक शाखा अथवा अभ्यासविषय आहे. ग्रीक तत्त्वचिंतक ॲरिस्टॉटलला तर्कशास्त्राचा जनक म्हटले जाते. (Father of Logic) पाश्चात्य तर्कशास्त्राप्रामाणे भारतीय तर्कशास्त्र देखील विकसित झाले आहे. तर्कशास्त्राचा विचार करताना त्याच्या व्याख्याच आपणाला या विषयाची व्याप्ती, स्वरूप व उपयोगिता अधिक स्पष्ट करून सांगताना दिसते.

तर्कशास्त्राच्या प्रामुख्याने तीन व्याख्या केल्या जातात.

१. तर्कशास्त्र विचारांचे शास्त्र आहे.
२. तर्कशास्त्र अनुमानाचे शास्त्र आहे.
३. तर्कशास्त्र आकारिक शास्त्र आहे.




यामधील प्रात्येक व्याख्या आपणाला तर्कशास्त्राची सद्यकालीन उपयोगिता अधिक स्पष्टपणे सांगण्याचा प्रायत्न करते, ते पुढील प्रामाणे पाहता येईल.

### १. तर्कशास्त्र विचारांचे शास्त्र आहे.

मनुष्य साधारणपणे जन्माला आल्यापासून मृत्यूच्या शेवटच्या घटकेपर्यंत आणि सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत कायमच विचार करीत असतो. किंबहूना तो रात्रीही झोपेत देखील विचार करत असल्याचे दिसते

कारण तो स्वप्न पाहतो ते त्याचे विचारी मन जागृत आहे त्यामुळेच ना ? मनुष्य पृथ्वीतलावर आल्यापासून तो कायमच विचारात मग्न असल्याचे दिसते व काळाच्या ओघात त्याचे विचार अधिकच प्रगल्भ व विकसित होत गेले. अन्न शिजवून खाण्यापासून विचाराला सुरूवात झाली ते आज आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास हे विचारांचेच फलित आहे. विज्ञानातील प्रत्येक शोध, तर्क, अनुमान आणि निरीक्षणावरच आधारित आहे. या सर्वांचा गाभा विचार हाच आहे. त्याचप्रामाणे गुरूत्त्वाकर्षणाचा न्यूटनचा नियम इ. गोष्टी, अथवा निर्माण झालेले शोध व नियम हा विचारी मनाचाच एक अविष्कार आहे. साहित्य निर्मितीत मन गुंतलेले असते तेव्हा मन देखील विचारांचेच प्रातिनिधित्व करीत असते.

## २. तर्कशास्त्र अनुमानाचे शास्त्र आहे.

आपण जी कृती करतो त्या प्रात्येक कृतीमागे अनुमान, तर्क आणि त्याचबरोबर निरीक्षण या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एखाद्या नवा शोध लावायचा असेल तर त्याबद्दल अनुमान व तर्कानेच सुरूवात होउन ते पूर्णत्वास जाते. विचारांना दिशा व चालना मिळते व संशोधनास सुरूवात होउन ते पूर्णत्वास जाते. प्रश्न पडला नाही, तर्क, अनुमान व निरीक्षण केले नाही तर पुढे नव्याने काहीही निर्माण होउ शकणार नाही. साहित्यिक व कवी यांना कल्पना सुचते ती तर्क व अनुमान आणि निरीक्षण शक्तीमुळे आणि त्याच आधारावर साहित्यिक म्हणजे कवी, लेखक, कथाकार आपली साहित्यनिर्मिती करीत असतात.

अनुमान आणि तर्काच्या आधारावरच विविध क्षेत्रातील संशोधन उदयास येउन प्रसिद्धीस येते. नवनवीन शोध, पेटंट निर्माण होण्यासाठी सुप्त शक्ती किंवा उर्जा ही अनुमान आणि तर्क हीच आहे.

## ३. तर्कशास्त्र आकारिक शास्त्र आहे.

तर्कशास्त्राप्रमाणेच गणित व भूमिती ही शास्त्रे देखील आकारिक शास्त्रे आहेत. विचार आणि विचारांच्या रचनेला तर्कशास्त्र महत्व देते. तर्कशास्त्रावर आधारित निष्कर्ष काढले जातात. त्यासाठी आधार म्हणजेच पुराव्याला विशेष महत्त्व असते. प्रत्येकवेळी वास्तवाशी तार्किक रचना व त्यापासून प्राप्त झालेला निष्कर्ष संबंधित असेलच असे नाही. मात्र येथे आकारिकता पाळण्याचा काटेकोर प्रयत्न केला जातो. आकारिक तर्कशास्त्राचा सर्वाधिक वापर आणि उपयोजन न्यायव्यवस्था व न्यायप्राक्रियेमध्ये होत असतो. ज्या प्राकारचे पुरावे न्यायाधिशांसमोर मांडले जातात किंवा पुरविले जातात त्यावरच आधारित न्याय न्यायाधिशांकडून दिला जातो. पुराव्यांच्या आधारे गुन्हेगाराला सौम्य शिक्षा होते किंवा तो निर्दोष सुटतो मात्र भक्कम पुरावा गुन्हेगाराला कठोर शिक्षा देण्यास उपयुक्त ठरतो.

## तर्कशास्त्र व स्पर्धापरीक्षा

तर्कशास्त्राचे स्पर्धापरीक्षेतील महत्व अनन्यसाधारण आहे. स्पर्धा परीक्षेमध्ये तार्किक बुद्धीमापन हा महत्वाचा घटक आह. या घटकाची मूलभूत माहिती तर्कशास्त्र पुरविते. ज्याचा तार्किक बुद्धिमापन हा घटक चांगला असेल असेच विद्यार्थी अधिक चांगल्या पद्धतीने मेरिटमध्ये असू शकतात. कारण तार्किक बुद्धिमापान या घटकातील उत्तरे पाठ करून किंवा घोकंपटटीने सोडविण्याचा विषय नाही. त्यामळे या घटकातील प्रश्नांची उत्तरे त्या त्या वेळीच सोडविणे आवश्यक असते. या प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी तर्कशास्त्राचे ज्ञान नसणा—या विद्यार्थ्यांना अधिक वेळ लागतो तर तर्कशास्त्राचे ज्ञान असणारा अतिशय कमी वेळेत या घटकातील उत्तरे अचूक पद्धतीने सोडवू शकतो. तर्कशास्त्रातील व्हेन आकृती, युक्तिवाद, संच विज्ञान, व्हेन आकृती विश्लेषण, तदेवता, सादृश्यानुमान, तर्क, अनुमान, निरीक्षण, विगमन, संबंधवाची तर्कशास्त्र इ. तर्कशास्त्राच्या मूलभूत संकल्पना स्पर्धापरीक्षेत उपयुक्त ठरतात.

## संदर्भग्रंथ

१. तर्कशास्त्र परिचय, (२००५), केदारनाथ तिवारी, मोतीलाल बनारसीदास प्रकाशन, नवी दिल्ली
२. तर्करेखा, (१९७५), सुरेंद्र बारलिंगे व मो. प्रा. मराठे, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे
३. तर्कविद्या २, (२००३), डॉ. बै. आर. जोशी, प्रा. एस. व्ही. कुलकर्णी व प्रा. ई. आर. मठवाले स्वाती प्रकाशन, पूर्णा
४. तर्कशास्त्राची मूलतत्त्वे,(१९६६), प्रा. दे. दि. वाडेकर, गो. य. र. राणे प्रकाशन, पुणे